# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, संक्षिप्त अहवाल
## शैक्षणिक वर्ष : २०१८–१९

**विद्यापीठाचे नाव : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** **एसटीडी कोड : ०२०**

**संपर्क : दुरध्वनी क्रमांक : ०२०–२५६९७३४१, ०२०–२५६०११५३**

**फॅक्स कमांक : –**

**ई–मेल :** nss@unipune.ac.in, nss@pun.unipune.ac.in

**स्वयंसेवक संख्या : एकूण : ५७६००** **मुले : ३४९०८** **मुली : २२६९२**

| **कार्यक्रम अधिकारी जिल्हानिहाय** | **एकूण** | **स्त्री** | **पुरूष** | **प्रशिक्षित** | **अप्रशिक्षित** |
|---|---|---|---|---|---|
| पुणे शहर | २२९ | ५० | १७९ | १५० | ७९ |
| पुणे ग्रामीण | १६२ | २४ | १३८ | ९९ | ६३ |
| अहमदनगर | १५३ | ३३ | १२० | ९० | ६३ |
| नाशिक | १८६ | ३६ | १५० | ९७ | ८९ |
| | ७३० | १४३ | ५८७ | ४३६ | २९४ |

| **उपक्रम** | **शिबिरे संख्या** | **स्वयंसेवक संख्या** | **लाभार्थी** |
|---|---|---|---|
| पल्स पोलिओ लसीकरण | ५० | १५०० | २००० |
| आपत्ती व्यवस्थापन | ३ | ६५० | १००० |
| आरोग्य विषयक शिबिरे | ३५० | २७०० | ४७०० |
| रक्तदान | १०० | ८००० | १५००० |
| वृक्षारोपण | २१० | १६००० | – |

**रक्त बाटल्या संकलन संख्या :** ५४५० **वृक्षारोपण संख्या :** ३६६९४

**नियमित कार्यक्रम : उपक्रमात राबविलेले उपक्रम**

स्वच्छ भारत अभियान, रोकडविरहीत व्यवहार, रस्ता सुरक्षा अभियान, ग्राहक संरक्षण जागृती, वृक्षारोपण उपक्रम, जलसंधारण अभियान

**विशेष शिबिरे :**

**एकूण संख्या :** ३६०+१५२ विशेष शिबिरे (नियमीत एकक व स्वयंनिर्वाही एकक)

**एकूण स्वयंसेवक :** २८८०० मुले – १७५७० मुली – ११२३०

**विशेष शिबिरात राबविलेले उपक्रम**

स्वच्छ भारत अभियान, रस्ता सुरक्षा अभियान
वृक्षारोपण, अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रम, ग्राम सर्वेक्षण

**नाविण्यपूर्ण उपक्रम :**

- प्रेरणा – राज्यस्तरीय नेतृत्त्व गुणविकास शिबिर – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, येथे ८ विद्यार्थी, ८ विद्यार्थीनी व १ संघनायक सहभागी
- आंतरराष्ट्रीय योगा दिन – २१ जून २०१८ – पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील महाविद्यालये सहभागी
- स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवडा– पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील महाविद्यालये सहभागी

| | |
|---|---|
| १ | राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन हे मुंबई येथे घेण्यात येते तसेच दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाचे आयोजन करण्यात येते त्यानुसार दि. २६ जानेवारी २०१९ च्या प्रजासत्ताकदिन संचलनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्यस्तरीय/राष्ट्रीय प्रजासत्ताकदिन संचलनपूर्व 'विद्यापीठस्तरीय' निवडचाचणी शिबिराचे आयोजन दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मध्ये करण्यात आलेले होते आणि विद्यापीठस्तरीय निवडचाचणी शिबिरामधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची दि. ०८ ते १० सप्टेंबर २०१८ या कालावधीत राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिन संचलनपूर्व निवडचाचणी शिबिर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या ठिकाणी पार पडले यामध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यस्तरीय प्रजासत्ताकदिन संचलनपूर्व निवडचाचणी शिबिरास डॉ. अतुल सांळुखे राज्यसंपर्क अधिकारी, काद्री नरसिंह क्षेत्रीय संचालक, पुणे आणि प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हे उपस्थित होते. |
| २ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व लोकबिरादरी मित्र मंडळ ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'आठवणीतलं पुणं.सायकलींचं पुणं' या उपक्रमानिमित्त Cyclothan चे आयोजन दि. ०७ आक्टोंबर २०१८ रोजी करण्यात आले होते. या उपक्रमाला डॉ. नितीन करमळकर कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. विलास उगले व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ उपस्थित होते. सायकल रॅलीची सुरूवात दि. ०७ सप्टेंबर २०१८ सकाळी ६.३० वा. सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे या ठिकाणावरून करण्यात आली होती. सदर रॅली सर परशुरामभाऊ महाविद्यालय—टिळक रोड—गणेशखिंड रोड—सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या मार्गाने आयोजित करण्यात आली होती. सदर उपक्रमात पुणे शहरातील ५०० स्वयंसेवक व प्राध्यापक सहभागी झाले होते. |
| ३ | महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंर्पक महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या युवा माहिती दूत या मोबाईल ॲपद्वारे योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत महाविद्यालयांना सूचित करण्यात आलेले होते. यामध्ये प्रत्येक महाविद्यालयामध्ये एक मार्गदर्शक नेमण्यात आला आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वत: या ॲप्लीकेशनवर स्वत:ची नावनोंदणी करावयाची होती. सहा महिन्याच्या कालावधीत किमान ५० प्रस्तावीत लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांच्याशी संपर्क साधून, त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या योजनांची माहिती त्यांना देण्यात आली. दि. १२ ऑक्टोबर २०१८ रोजी युवा माहिती दूत प्रशिक्षण ही एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये २५० प्राध्यापक सहभागी झाले होते. |
| ४ | ११ सप्टेंबर २०१८ ते ३० जानेवारी २०१९ यादरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाने समर्थ भारत अभियान अंतर्गत ससून रूणालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठस्तरीय रक्तदान साखळीशिबिरांचे आयोजन करण्याचे निर्धारीत केले होते. सदर उपक्रमात पुणे शहरातील ५० महाविद्यालये साखळी पध्दतीने रक्तदान शिबिरात स्वयंसेवक व प्राध्यापक सहभागी झाले होते. या रक्तदान शिबिरामधुन १,५०० रक्त बॅगांचे संकलन करण्यात आले. |
| ५ | युवा व क्रीडा खेल मंत्रालय, भारत सरकार यांनी उद्घोषित केल्यानुसार दि. ३१ ऑक्टोबर हा दिवस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिना निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. राष्ट्रीय एकात्मतेत भारतीय ऐक्य, सुरक्षा व संरक्षण याकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाची जाणीव आपणांस आहेच. भारतीय ऐक्य, सुरक्षा व संरक्षण या क्षेत्रामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून हा दिवस साजरा करण्यात येतो. दि. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिना निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' उपक्रमाच्या आयोजनाबाबत सविस्तर परिपत्रक प्रसारित करण्यात आले होते. त्या आधारे रासेयो संलग्नीत महाविद्यालयात सर्वांना 'राष्ट्रीय एकता दिवस' शपथ देण्यात आली. तसेच पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जिवनपटावर आधारीत कार्यक्रमांचे आयोजन (उदा. वक्तृत्त्व, निबंध, पोस्टर स्पर्धा, चित्रफीत, माहितीपट, प्रदर्शन इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले). |
| ६ | महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दि. १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत रासेयो स्वंयसेवकांनी सामुहीक वाचन, वृत्तपत्र—अग्रलेख यांचे वाचन तसेच कार्यक्रमात बुके न देता बुक देणे अशा स्वरूपाच्या उपक्रमांचे आयोजन केले होते. |
| ७ | राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी पाठवलेल्या पत्रानुसार भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीस २५ वर्ष पूर्ण झाल्या बद्दल नोंव्हेबर २०१७ पासुन 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर राष्ट्रीय परिषद झाली तसेच २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदांमध्ये मतदार जागृती संदर्भात लोकशाहीचे शिक्षण मतदारांना देण्याची आवश्यक्ता आहे. या अनुषंगाने लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त व काही जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालावरून दि. २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत विभाग, जिल्हा व तालुका पातळीवर लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा. 'जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार!' या विषयावरती आधारित लोकजागृती करावी. |
| ८ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पर्यावरणशास्त्र विभाग व गांधी १५० वी जयंती अभियान आणि महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने पुणे शहरातील ३०० स्वयंसेवकाकरिता 'आजचा पाणी प्रश्न आणि दुष्काळ' या विषयावर दि. १६ डिसेंबर २०१८ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत 'रोजगार हमी योजना व ग्राम रोजगार सेवक म्हणून विद्यार्थ्यांना संधी' तसेच 'महालाभार्थी—ॲप' च्या माध्यामातून महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना विद्यार्थ्यांमार्फत ग्रामीण भागापर्यंत पोहचवणे या सदर्भात **श्री. उदय पंचपोर,** मुख्य |

| | |
|---|---|
| | कार्यकारी अधिकारी एम. के. सी. एल., पुणे हे माहिती दिली. 'आजचा पाणी प्रश्न आणि दुष्काळ' याविषयावरील गटचर्चेत **मा. जयवंत मठकर व महाराष्ट्र सर्वोदय मंडळातील तज्ज्ञ,** सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात **मा. डॉ. राजेंद्रसिंहजी, जलतज्ज्ञ, 'जोहड'** यांनी 'पाणी प्रश्न आणि पर्यावरण' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत उपस्थितांशी खुला संवाद केला. सदर कार्यशाळा डॉ. नितीन करमळकर कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या उपस्थितीत झाला. |
| ९ | पुणे पोलीस दलाच्या वतीने पुणे शहरातील नागरिकांना अधिक प्रभावी व परिणामकारक सेवा देण्याच्या दृष्टीने सर्व्हिस एक्सलन्स ॲन्ड व्हिक्टीम असिस्टन्स (S.E.V.A.) या सेवा ॲप यंत्रणेचे कामकाज पोलीस स्टेशनस्तरावर चालत असून नागरिकांना सुलभ व तात्काळ सेवा उपलब्ध होण्याकरिता मा. पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस आयुक्त कार्यालयाअंतर्गत ३० पोलीस स्टेशन मध्ये दि. १० डिसेंबर २०१८ रोजी सर्व्हे करण्यात आला. तरी या उपक्रमाकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीनेच्या ८० रासेयो स्वंयसेवक या उपक्रमात सहभागी झाले होते. |
| १० | पुणे महानगर प्रदेशाचा योजनाबद्धरीतीने विकास करण्यासाठी 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण' (PMRDA) हे नियोजन आणि विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. पीएमआरडीएतर्फे विकास योजना हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो, पुणे रिंग रोड, मुंबई–पुणे Hyperloop, प्रधानमंत्री आवास योजना व नगररचना योजना या प्रकल्पांच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरू आहे. सामाजिक बांधीलकी व प्राधिकरण क्षेत्रातील विकास योजनांच्या आराखडयासाठी प्राधिकरणातर्फे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्याचे ठरले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीनेच्या २० रासेयो स्वंयसेवक या उपक्रमात सहभागी झाले होते. |
| ११ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नियमित कार्यक्रमांतर्गत स्वामी विवेकानंद जयंती निमित्त दि. १२ ते १८ जानेवारी २०१९ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयांमध्ये 'युवा सप्ताह' साजरा करण्यात आला. या युवा सप्ताहानिमित्त खालील विषयांवर आधारीत कार्यक्रमांतर्गत विविध कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन आपल्या महाविद्यालयांमध्ये करण्यात आले होते. यामध्ये स्वामी विवेकानंदांचे विचार व आजचा युवक, स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानाकरिता युवक, वित्तीय साक्षरता अभियान, प्लॅस्टीक कचरा निर्मूलन, मतदार जनजागृती, युवकांची बदलती मानसिकता, युवकांमधील वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर पुणे, अहमदनगर व नाशिक मधिल रासेयो संलग्नीत महाविद्यालयामध्ये कार्यक्रमांचे व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. |
| १२ | दरवर्षी दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलनाचे आयोजन २६ जानेवारी रोजी करण्यात येते. त्यानुसार मा. क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, क्षेत्रीय संचलनालय, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांनी पाठविलेल्या पत्रानुसार राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराचे आयोजन दि. १ ते ३१ जानेवारी २०१९ या दरम्यान आंतरराष्ट्रीय युवक वसतीगृह, न्यायामार्ग, चाणक्यपुरी, नवी दिल्ली याठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ४ स्वयंसेवक सहभागी झालेले होते. |
| १३ | दरवर्षी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलनाचे आयोजन २६ जानेवारी रोजी करण्यात येते. त्यानुसार मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिराचे आयोजन दि. १७ ते २६ जानेवारी २०१९ या दरम्यान मुंबई येथे आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे १२ स्वयंसेवक सहभागी झालेले होते. |
| १४ | महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांनी निर्देशित केल्याप्रमाणे २५ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०१९ दरम्यान 'लोकशाही पंधरवडा' साजरा करण्याचे केले होते. यामध्ये मतदार जनतागृतीच्या संदर्भत वेगवेगळे उपक्रम आयोजित केले होते. तसेच या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवकांकरिता दि. ६ फेब्रुवारी २०१९ रोजी,निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. |
| १५ | मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सन २०१८–१९ वर्षात 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे दि. २७ ते ३० जानेवारी २०१९ दरम्यान करण्यात आले होते. सदर 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत महाराष्ट्रातील १६ विद्यापीठांमधून प्रत्येकी १९ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सन २०१८–१९ वर्षाचे सर्वसाधारण विजेतेपदासह ६ कलाप्रकारात एकूण १४ पारितोषिके मिळाली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सलग चौथ्यांदा 'उत्कर्ष' विजेते पदावर मोहर उमटवली. |
| १६ | मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला आणि युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांनी कार्यान्वित केलेला 'राष्ट्रीय युवक संसद महोत्सव २०१९–'नवीन भारताच्या आवाजाचे निर्माण' हा कार्यक्रम संपूर्ण देशभर आयोजित केला गेला दि. १२ ते १८ जानेवारी २०१९ दरम्यान ऑनलाईन स्क्रिनींगद्वारे तसेच त्या व्यतिरिक्त ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्क्रिनींगद्वारे शक्य झाले नाही त्या विद्यार्थ्यांकरिता प्रत्यक्ष जिल्हानिहाय युवकसंसद निवडचाचणीचे आयोजन दि. १७ ते १९ जानेवारी २०१९ दरम्यान करण्यात आले होते. या दोन्ही निवडप्रक्रियेमधून निवड झालेल्या स्पर्धकांच्या जिल्हास्तरीय 'जिल्हा युवकसंसद' स्पर्धेचे आयोजन दि. २४ जानेवारी २०१९ रोजी ज्ञानेश्वर सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या ठिकाणी करण्यात आले होते. या निवडचाचणीमध्ये पुणे जिल्हयातून १०० विद्यार्थ्यां सहभागी झाले होते. या निवडचाचणीस विद्यार्थ्यांना सदिच्छ देण्यासाठीएन. एस. उमराणी प्र–कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना |

| | |
|---|---|
| | उपस्थित होते. |
| १७ | मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला आणि युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांनी कार्यान्वित केलेला 'राष्ट्रीय युवक संसद' महोत्सव २०१९—नवीन भारताच्या आवाजाचे निर्माण' हा कार्यक्रम संपूर्ण देशभर आयोजित केला गेला या राज्यस्तरीय 'राज्य युवकसंसद' महोत्सव स्पर्धेस एन. एस. उमराणी प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, कार्तिगेन डी. क्षेत्रीय संचालक, पुणे, प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हे उपस्थिती होते. महाराष्ट्र व गोवा राज्यांमधील ३७ जिल्हयांतील १११ स्वयंसेवक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या, ज्ञानेश्वर सभागृहात उपस्थित होते. |
| १८ | मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व शालेय शिक्षण, यांच्या सूचनेनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमधील रासेयो कार्यक्रम अधिकारी/जिल्हा समन्वयक/कार्यक्रम समन्वयक/संचालक यांची दि. २३ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी दोन दिवसीय कार्यशाळा बालेवाडी येथील शिव छत्रपती क्रीडापीठ संकुलात आयोजित करण्यात आलेली होती. या कार्यशाळा उद्घाटन समारंभास मा. मंत्री महोदय विनोद तावडे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, डॉ. अतुल साळुंखे राज्यसपर्क अधिकारी,रासेयो, राजेश पांडे आणि डॉ. विलास उगले व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर, प्रभाकर देसाई संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हे उपस्थित होते. यामध्ये महाराष्ट्र राज्यामधून २००० रासेयो व्यक्ती सहभागी झाले होते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **इतर कार्यशाळा** | | | | | |
| **नियमित कार्यक्रम नियोजन बैठक २०१८–१९** | | | | | |
| १ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे | नाशिक<br>अहमदनगर<br>पुणे शहर व ग्रामीण | ५०० | १ दिवसीय विद्यापीठस्तरीय | |
| **एस.आर.डी./एन.आर.डी. पूर्व निवड चाचणी शिबिर** | | | | | |
| १ | मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर, पुणे | एस.आर.डी./एन.आर.डी. निवड चाचणी शिबिर | ३०० | १ दिवसीय | जिल्हास्तर |
| २ | संगमनेर महाविद्यालय, संगमनेर | एस.आर.डी./एन.आर.डी. निवड चाचणी शिबिर | १५० | १ दिवसीय | जिल्हास्तर |
| ३ | मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर गणपतदादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जि. नाशिक | एस.आर.डी./एन.आर.डी. निवड चाचणी शिबिर | १५० | १ दिवसीय | जिल्हास्तर |
| ४ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | एस.आर.डी./एन.आर.डी. निवड चाचणी शिबिर | १०० | १ दिवसीय | विद्यापीठस्तर |
| ५ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | एस.आर.डी./एन.आर.डी. राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिर | ३१० | ३ दिवसीय | राज्यस्तरीय निवडचाचणी शिबिर |
| **आव्हान निवड चाचणी शिबिर** | | | | | |
| १ | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे | पुणे जिल्हा | २०० | १ दिवसीय | जिल्हास्तरीय |
| २ | संगमनेर महाविद्यालय,संगमनेर | अहमदगनर | १५० | १ दिवसीय | जिल्हास्तरीय |
| ३ | के.व्ही.एन. नाईक महाविद्यालय, नाशिक | नाशिक | १५० | १ दिवसीय | जिल्हास्तरीय |

**सन २०१८–१९**

**रासेयो स्वयंसेवक सहभाग**

**उत्कर्ष : राज्यस्तरीय सांस्कृतिक व सामाजिक स्पर्धा**

२७ ते ३० जानेवारी २०१९ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आयोजन करण्यात आले होते. यास्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सर्वसाधारण विजेतेपदासह १० कला प्रकारात पुरस्कार मिळाले

**पुरस्कार प्राप्त**

आव्हान–२०१८ : उत्कृष्ट जिल्हा
उत्कर्ष २०१७ः सर्वसाधारण विजेतेपद व ९ कला प्रकारात प्रथम पुरस्कार
उत्कर्ष २०१८ः सर्वसाधारण विजेतेपद व ९ कला प्रकारात प्रथम पुरस्कार
उत्कर्ष २०१९ः सर्वसाधारण विजेतेपद व १० कला प्रकारात प्रथम पुरस्कार
राज्यस्तरीय पुरस्कार २०१७–१८ः
श्री. ऋषीकेश चव्हाण – उत्कृष्ट स्वयंसेवक
डॉ. विशाल गायकवाड–कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी – राज्यस्तरीय पुरस्कार – उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी – राज्यस्तरीय पुरस्कार – राज्यस्तरीय पुरस्कार – उत्कृष्ट महाविद्यालय

**राष्ट्रीय एकात्मता शिबिरे सहभाग**

- १३ ते १९ नोव्हेंबर २०१८, महात्मा ज्योतिबा फुले रूहेलखंड विश्वविद्यालय, बरेली, उत्तरप्रदेश ५ स्वयंसेवक, ५ स्वयंसेविका व १ संघनायक
- १५ ते २१ डिसेंबर २०१८, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ९ स्वयंसेवक, ९ स्वयंसेविका व १ संघनायक

**साहसी क्रीडा शिबिर**

२२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०१८, पोंग डॅम, हिमाचलप्रदेश, ५ स्वयंसेवक, ५ स्वयंसेविका व १ संघनायक
२९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१९, चिखलदरा, अमरावती, ४ स्वयंसेवक, ४ स्वयंसेविका व २ संघनायक

**राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर :**

दि. २६ जानेवारी २०१९ रोजी मुंबई सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे १४ स्वयंसेवक सहभागी

**राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर :**

दि. २६ जानेवारी २०१९ रोजी राजपथ, नवी दिल्ली येथे ५ स्वयंसेवक सहभागी

**आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग :**

१. स्वयंसेवक सहभागी – कु. अमृता यादव – मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे, आंतरराष्ट्रीय युवक प्रतिनिधी आदान प्रदान कार्यक्रम, दक्षिण कोरिया (International Youth Delegation Exchange Program, South Korea)

**कार्यक्रम अधिकारी/जिल्हा समन्वयक / संचालक यांच्या पुढाकाराने आयोजित केलेला विशेष उपक्रम**

पुणे ते पंढरपूर स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान दिंडी– २०१८, दि. ३ ते २४ जुलै २०१८ दरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर स्वच्छता अभियान, पुणे अहमदनगर व नाशिक जिल्ह्यामधून २०० स्वयंसेवक सहभागी व आळंदी ते पंढरपूर मार्गामधील १०० महाविद्यालये व १०००० स्वयंसेवक स्वच्छता अभियानामध्ये सहभागी
जागतीक पर्यावरण दिन – दि. ५ ते १२ जून २०१८, स्थळ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पर्यावरण संवर्धन शिबिर – पुणे अहमदनगर व नाशिक जिल्ह्यामधून २०० स्वयंसेवक सहभागी

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, सरकारी/स्वयंसेवी संस्था सांयुक्तिक उपक्रम**

१. नमामी चंद्रभागा जल साक्षरता यात्रा-२०१८ - जल बिरादरी महाराष्ट्र, जीवित नदी, पुणे, महाराष्ट्र विकास केंद्र, पुणे आणि पर्यावरण क्षेत्रामध्ये कार्यरत विविध संस्था
२. महसूल व वन विभाग : १ ते ७ जुलै २०१८ दरम्यान वृक्षारोपण कार्यक्रम (पुणे, अहमदनगर व नाशिक)
३. युवा व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार - संविधान दिन - २६ नोव्हेंबर २०१८
४. पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, पुणे - जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती - दि. १ डिसेंबर २०१८
५. 'ग्राहक संरक्षण आणि जागृती कार्यक्रम' - भारतीय ग्राहक मार्गदर्शन संस्था, मुंबई
६. 'आठवणीतलं पुणं... सायकलींचं पुणं' - लोकबिरादरी मित्र मंडळ ट्रस्ट, पुणे
७. जागतिक मानसिक आरोग्य दिवस - अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे
८. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिना निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस'
९. दि. १९ ते २५ नोव्हेंबर २०१८ - सामाजिक सलोखा मोहिम सप्ताह
१०. आरोग्य चित्रपट महोत्सव - पी.एम. शहा फाऊंडेशन, पुणे
११. स्वच्छता सर्वेक्षण २०१९ - पुणे महानगरपालिका

**प्रसार माध्यमांचा उपयोग : -**

**रासेयो कार्याचे आर्थिक मुल्यांकन**

**नियमित कार्यक्रम : रू. १,५०,००,०००/-**

**विशेष शिबिरे : रू. १,५०,००,०००/-**

**इतर कार्यक्रम रू. ५०,००,०००/-**

| क्र. | जिल्हा समन्वयक नाव | भ्रमणध्वनी | कार्यालय | फॅक्स | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. विलास उगले | ९४२२७३५५६९ | - | | viugale@gmail.com |
| २ | डॉ. शिवाजी पाचारणे | ९८२२६२६७७८ | - | | shivajirpacharane@gmail.com |
| ३ | डॉ. सविता कुलकर्णी | ७७२००३६७७४ | - | | s.kulkarni72@yahoo.com |
| ४ | डॉ. भारत राठोड | ८३८००६६८६७ | - | | rathodbv26@gmail.com |
| ५ | डॉ. श्रीकांत फुलसुंदर | ९८६०२८६४११ | - | | shrikantmf123@gmail.com |
| ६ | डॉ. विशाल गायकवाड | ९८६०४०२३६५ | - | | vgaikwad888@gmail.com |
| ७ | डॉ. किशोर लिपारे | ७६७६४८१२२७ | - | | aylipare@yahoo.com |
| ८ | डॉ. प्रताप फलफले | ८२७५२८१०८९ | - | | pjphalphale@gmail.com |
| ९ | डॉ. शैलेंद्र बनसोडे | ९२२६३२२०८२ | - | | shailendra_bansode31@rediffmail.com |
| १० | डॉ. रविंद्र आहिरे | ९७६५२१९४२२ | - | | rahire1982@gmail.com |
| ११ | डॉ. डी. के. आहेर | ९४२११२५७२०५ | - | | dkaher1966@gmail.com |
| | | **मा. संचालक यांची माहिती** | | | |
| १ | डॉ. प्रभाकर देसाई | ९८८१९०८०२० | ०२०-२५६९११५४ | - | nss@unipune.ac.in |

**विविध कार्यशाळांची माहिती :**

**रासेयो अनुदान तपशील**

| | नियमित कार्यक्रम रू. | विशेष शिबिरे रू. |
|---|---|---|
| **राज्यसरकार** | **१,१९,००,०००/-** | **१,०७,१०,०००/-** |

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**